जून ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत अतिवृष्टी व पूर यामुळे राज्यातील विविध जिल्हयात होणाऱ्या शेतीपिकांच्या तसेच मालमत्तेच्या नुकसानीसाठी वाढीव दराने मदत देण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय :- सीएलएस-२०२२/प्र.क्र.२५३/म-३,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक :- २२ ऑगस्ट, २०२२**

वाचा :- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक :- सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दिनांक १३.०५.२०१५
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.सीएलएस-२०२१/प्र.क्र.२०३/म-३, दि.११.०८.२०२१
३) मंत्रिमंडळाच्या दि.१०.०८.२०२२ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

**प्रस्तावना :-**

अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ या सारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे याकरिता शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान (Input subsidy) स्वरूपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विहित दराने मदत देण्यात येते. तसेच, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या इतर मान्य बाबींकरिता देखील विहित दराने मदत देण्यात येते. राज्यात जुलै,२०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे विविध जिल्हयात शेतीपिकांचे नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान स्वरूपात मदत देण्याबाबत, तसेच इतर नुकसानीकरिता मदत देण्याबाबत दि.१०.०८.२०२२ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. सदर मंत्रिमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रस्तुत प्रकरणी शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

जून ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीतील अतिवृष्टी, पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे राज्यात विविध जिल्हयात होणाऱ्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता बाधित शेतकऱ्यांना खालीलप्रमाणे वाढीव दराने निविष्ठा अनुदान स्वरुपात मदत प्रदान करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | बाब | प्रचलित दर | मदतीचे वाढीव दर |
|---|---|---|---|
| १. | जिरायत पिकांच्या नुकसानीसाठी मदत | • रू.६८००/- प्रति हेक्टर, २ हेक्टरच्या मर्यादेत | • रू. १३६००/- प्रति हेक्टर, ३ हेक्टरच्या मर्यादेत |
| २. | बागायत पिकांच्या नुकसानीसाठी मदत | • रू.१३,५००/- प्रति हेक्टर, २ हेक्टरच्या मर्यादेत | • रू. २७,०००/- प्रति हेक्टर, ३ हेक्टरच्या मर्यादेत |
| ३. | बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी मदत | • रू १८०००/- प्रति हेक्टर, २ हेक्टरच्या मर्यादेत | • रू ३६,०००/- प्रति हेक्टर, ३ हेक्टरच्या मर्यादेत |

**२.** तसेच, जून ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीकरिता शेतीपिकांच्या नुकसानीव्यतिरिक्त इतर बाबीकरीता संदर्भाधीन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या दरानुसार मदतीचे वाढीव दर लागू करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**३.** राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधील विहित निकषाव्यक्तीरिक्त अथवा दरापेक्षा अधिक दराने देण्यात येणाऱ्या मदतीची रक्कम वरील विवरणपत्रात दर्शविण्यात आल्याप्रमाणे राज्य शासनाच्या निधीतून त्या त्या लेखाशीर्षाखाली खर्च करण्यात यावी.

**४.** मदतीची रक्कम प्रदान करण्यासाठी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या इतर अटी व शर्ती लागू राहतील. तसेच शेतीपिकांचे नुकसानीकरिता संपूर्ण हंगामामध्ये एकाच वेळी अनुदान अनुज्ञेय आहे.

**५.** पंचनामे करण्यात आल्यानंतर लाभार्थी निश्चित करण्यात यावेत. त्यानंतरच यासाठी निधी वितरीत केल्यानंतर रक्कम आहरित करून लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये हस्तांतरित करावी. सदर निधी अनावश्यकरित्या आहरित करून बँक खात्यामध्ये काढून ठेवण्यात येवू नये. लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्हयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा. तसेच लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील केंद्र शासनाच्या ndmis.mha.gov.in या संकेतस्थळावरील प्रणालीमध्ये भरण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करावी.

**६.** सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक :- २८२/२०२२/व्यय-९, दिनांक १८.०८.२०२२ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

**७.** सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२२०८२२१६३८४४०२१९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(संजय औ. धारूरकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधान परिषद), विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
३. महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय विधान सभा/विधान परिषद सदस्य, विधान भवन, मुंबई,
४. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय,मुंबई,
५. सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व विभागीय आयुक्त,
८. आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे,
९. सर्व जिल्हाधिकारी.
१०. निवडनस्ती (म-३)